# पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण

नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी रेल्वे स्टेशनजवळ, आकुर्डी, पुणे-४४, दुरध्वनी क्र. : ०२०-२७६५२९३४/३५
फॅक्स क्र. (०२०)२७६५३६७० ई-मेल : pcntda@yahoo.com वेबसाईट : www.pcntda.org.in

PCNTDA
सेवा श्रद्धासमन्विता

## जाहिरात

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण कार्यालयात १२.५% परतावा जमीन वाटप या विवक्षित कामासाठी खालील पदावर करार पद्धतीने सेवानिवृत्त अधिकाऱ्याची पारिश्रमिक तत्वावर ११ महिने कालावधीकरीता नेमणूक करावयाची आहे. सदर पद संख्येत वाढ होऊ शकते.

| अ.क्र. | पदनाम | संख्या | मुलाखतीचा दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| १. | नायब तहसिलदार | १ | ०९/०५/२०१७ | दुपारी १२.३० ते दुपारी १.३० |

महसूल खात्यातील सेवानिवृत्त नायब तहसिलदार ज्यांना भूसंपादन व जमीन विषयक कामांचा किमान ३ वर्षाचा अनुभव आहे असे सेवानिवृत्त नायब तहसिलदार हे अर्ज करण्यास पात्र राहतील.

महसूल खात्यातील सेवानिवृत्त नायब तबसिलदार यांचेकडून सोबतच्या नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. वयोमर्यादा ६५ वर्षे राहील. (दि. ०९/०५/२०१७ रोजीचे वय विचारात घेतले जाईल) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ मधील परि.९ मधील (ड) (१) (क) अनुसार पारिश्रमिक निश्चित करण्यात येईल.

**अर्ज करण्याची पद्धत व सर्वसाधारण सुचना :-**

उमेदवाराने सोबतच्या अर्जाच्या नमुन्यात स्वत:चे संपूर्ण नांव (आडनांव प्रथम), जन्मदिनांन, वय, लिंग, स्त्री/पुरुष, पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोडसहीत) व मोबाईल क्रमांक, ज्या कार्यालयातून सोवानिवृत्त झाले त्या कार्यालयाचे नांव, सेवानिवृत्तीचा दिनांक, शासकीय सेवेत असताना मिळालेले अंतिम वेतन व पदनाम तसेच सध्या मिळणारे निवृत्ती वेतन याबाबतचा तपशिल नमुद करुन अर्ज मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे-४४ या पदनामाने सादर करावा. अर्जाचा नमुना प्राधिकरण वेबसाईट : www.pcntda.org.in वर उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

अ. अर्जासोबत अलीकडील पासपोर्ट आकाराचा फोटो सांक्षाकित करुन चिटकवावा. अर्जाच्या लिफाफ्यावर ज्या पदाकरीता अर्ज केला आहे त्या पदाचे नांव न चुकता नमुद करावे.

**ब. अर्जासोबत खालीलप्रमाणे प्रमाणपत्रे सांक्षाकित करुन जोडावे.**

१) शासकीय संस्थेकडील सेवानिवृत्तीचा आदेश.
२) शैक्षणिक अर्हता धारण व इतर परिक्षा उत्तीर्ण असल्याबाबतच्या छायांकीत प्रति.

मुलाखतीचे वेळी मूळ प्रती सोबत आणाव्यात. मुलाखतीसाठी प्रवास खर्च दिला जाणार नाही. अर्जदारास सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक १७/१२/२०१६ च्या शासन निर्णयातील अटी व शर्ती लागू राहतील.

अर्जासोबत स्वत:चे नांव, पत्ता तसेच दुरध्वनी/मोबाईल क्रमांक लिहिलेला व रुपये ५/- चे पोस्टेज स्टॅम्प चिटकवून २३X१२ से.मी. आकाराचा लिफाफा जोडणे आवश्यक राहील. अर्ज खालील पत्यावर **दिनांक ०५/०५/२०१७ रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत पोहचेल असा पाठवावा. किंवा समक्ष आणून द्यावे. निवड झालेल्या उमेदवारांना विहित केलेल्या नमुन्यात रुपये १००/- च्या स्टॅम्पपेपरवर हमीपत्र द्यावे लागेल.**

निवड प्रकियेबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असेल, व याबाबा कोणताही आक्षेप विचारात घेतला जाणार नाही.

**टिप :- वरील दिनांकास मुळ कागदपत्रासह मुलाखतीस उपस्थित रहावे. मुलाखतीबाबत वेगळे पत्र पाठविले जाणार नाही.**

**पत्ता :-** मुख्य कार्यकारी अधिकारी
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,
आकुर्डी रेल्वे स्टेशनजवळ, आकुर्डी, पुणे - ४११ ०४४.

**सही/-**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**पिं.चिं.न.वि.प्रा, आकुर्डी, पुणे**

दिनांक : /०४/२०१७
जाहिरात क्र. २८/२०१७

**Size - 12 x 16**